भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील मुख्य भूभौतिकतज्ज्ञ, गट-अ या पदावरील तदर्थ पदोन्नती

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन आदेश क्रमांकः आपना-०२१९/प्र.क्र.२३/पापु-१५

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीख: ३० मे, २०१९

शासन आदेश :-

सन २०१८-१९ या निवडसूची वर्षामध्ये भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील खालील वरिष्ठ भूभौतिकतज्ज्ञ (Senior Geophysicist), गट-अ (राजपत्रित) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-२१ : ५७१००-१८०८००) यांना मुख्य भूभौतिकतज्ज्ञ (Chief Geophysicist), गट-अ (राजपत्रित) (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी S-२३ : ६७७००-२०८७००) या पदावर या आदेशाद्वारे विहित अटींच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच त्यांना स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे महसुली विभाग वाटप करण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ६ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	प्रवर्ग	सध्याचे कार्यालय	पदोन्नतीनंतर वाटप केलेला महसुली विभाग	मुख्य भूभौतिकतज्ज्ञ पदावरील तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना केलेले कार्यालय
१	*२*	*३*	*४*	*५*	*६*
१	श्री. नोरी व्यंकटेश्वरा शर्मा.	खुला	प्रादेशिक उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे	पुणे	संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे या कार्यालयातील मुख्य भूभौतिकतज्ज्ञ या पदावर.

०२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. खुल्या प्रवर्गातील अधिकारी/

कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत. तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील मुख्य भूभौतिकतज्ञ हे एकाकी पद असून सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०२/११/१९९६ नुसार एकाकी पदासाठी भरती व बढतीमध्ये आरक्षण लागू होत नाही. त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून तसेच पुढील अटींच्या अधीन राहून श्री.एन.व्ही. शर्मा, वरिष्ठ भूभौतिकतज्ञ यांना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील मुख्य भूभौतिकतज्ञ या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे :-

(अ) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरूपातील तदर्थ पदोन्नती राहील**.

(आ) सदर पदोन्नती, सद्य:स्थितीत वरिष्ठ भूभौतिकतज्ञ या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही, तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन केवळ तात्पुरत्या / तदर्थ स्वरूपात देण्यात येत आहे.

(इ) सन २०१८-१९ या निवडसूची वर्षाकरिता पात्र वरिष्ठ भूभौतिकतज्ञ यांची निवडसूची तदर्थ स्वरुपाची असून मुख्य भूभौतिकतज्ञ पदावरील पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. **परिणामी निवडसूचीतील वरिष्ठ भूभौतिकतज्ञ यांना मुख्य भूभौतिकतज्ञ या पदावरील नियमितपणाचे व सेवा ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क मिळणार नाहीत.**

(ई) श्री.एन.व्ही. शर्मा, वरिष्ठ भूभौतिकतज्ञ यांची मुख्य भूभौतिकतज्ञ या पदावरील तदर्थ पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. संचालनालयाने याची खात्री करावी.

(उ) श्री.एन.व्ही. शर्मा, वरिष्ठ भूभौतिकतज्ञ यांनी मुख्य भूभौतिकतज्ञ या पदावरील तदर्थ पदोन्नती न स्वीकारल्यास त्यांचे नाव सन २०१८-१९ च्या निवडसूचीमधून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसुच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत मुख्य भूभौतिकतज्ञ पदावरील तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

०३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांना संबंधित कार्यालयाने तात्काळ कार्यमुक्त करून या विभागास कळवावे. तसेच पदोन्नत अधिकाऱ्यांनी पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेत बदल करण्याच्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही.

०४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 201905301755454028 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.05.30 18:22:19 +05'30'

(चेतन निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

श्री. एन.व्ही. शर्मा, वरिष्ठ भूभौतिकतज्ञ, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
१०. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
१३. उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. उपसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (सर्व), मंत्रालय, मुंबई.
१५. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. उप संचालक (सर्व), भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा.
१७. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे विभाग, पुणे.
१८. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालय प्रमुख/ विभाग प्रमुख.
१९. निवडनस्ती, कार्यासन पापु-१५.